चालण्याने मानसिक समस्यांमध्ये घट

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : वयाच्या ११ व १२ व्या वर्षी दररोज जास्त पावले चालणाऱ्या किशोरांचे मानसिक आरोग्य वर्षभराच्या काळात अधिक चांगले राहात असल्याचे एका संशोधनातून समोर आले आहे. 'द जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशन नेटवर्क ओपन' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या या अभ्यासानुसार, दररोज १२ हजार किंवा त्याहून अधिक पावले चालणाऱ्या मुलांमध्ये मानसिक समस्या सर्वात कमी दिसून आल्या आहेत. विशेष म्हणजे, पावलांची संख्या वाढेल तसा हा फायदा अधिक वाढतो आणि तो एका विशिष्ट मर्यादेवर थांबत नाही.



अमेरिकेतील 'ॲडोलसंट ब्रेन कॉग्निटिव्ह डेव्हलपमेंट स्टडी' अंतर्गत ५,५१५ किशोरांवर हे संशोधन करण्यात आले. यात मुलांच्या फिटनेस ट्रॅकरच्या माहितीची आणि त्यांच्या मानसिक आरोग्याची तुलना करण्यात आली. दररोज ५ हजारपेक्षा कमी पावले चालणाऱ्या मुलांमध्ये मानसिक समस्यांची लक्षणे सर्वाधिक आढळली, तर ८ हजार आणि १२ हजार किंवा त्याहून अधिक पावले चालणाऱ्या मुलांमध्ये ही लक्षणे अनुक्रमे कमी होत गेल्याचे आढळले. संशोधकांप्रमाणे, जास्त चालणाऱ्या मुलांच्या मेंदूतील हालचाल आणि भावनांचे नियंत्रण करणाऱ्या भागांमधील रचनेत सकारात्मक बदल दिसून आले, जे चांगल्या मानसिक आरोग्याशी जोडलेले आहेत. तज्ज्ञांच्या मते, रोजचे चालणे हा सोपा व मोफत उपाय असून यामुळे किशोरांच्या मेंदूचा आणि मानसिक आरोग्याचा उत्तम विकास होतो.



'एमईआरसी', महावितरणला समन्स

अपीलिय न्यायाधिकरणावरील आरोपांचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : अपीलिय न्यायाधिकरण खासगी वीज कंपन्यांना झुकते माप देत असल्याचा आरोप करणारे पत्र मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांना लिहिल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायाधिकरणाने वीज नियामक आयोगाचे सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष यांना समन्स बजावले आहे. न्यायाधिकरणाने संकेतस्थळावर या संबंधीच्या आदेशाची प्रत प्रसिद्ध केली आहे.

पॉवर कंपनी ऑफ कर्नाटका विरुद्ध वीज नियामक आयोग आणि इतर या खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती वीरेंद्र भट आणि तांत्रिक सदस्य अजय तळेगावकर यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरण आणि राज्य वीज नियामक आयोगाशी (एमईआरसी) संबंधित एका अपिलासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून अपिलीय न्यायाधिकरण खासगी कंपन्यांना झुकते माप देत असल्याचा आरोप केला होता. तसेच, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'एमईआरसी'च्या बाजूने युक्तिवाद करताना अपिलात काय सुरू आहे, हे तपासण्याची मागणी सरन्यायाधीशांकडे केली होती. या पार्श्वभूमीवर, अपिलीय न्यायाधिकरणाने 'एमईआरसी'चे सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना समन्स बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

पार्श्वभूमी काय?

'महावितरण'ने एका खासगी कंपनीबरोबर वीज खरेदी करार केला होता. मात्र, केंद्र सरकारच्या कोळसा खरेदीसंदर्भातील एका निर्देशामुळे विजेची किंमत वाढली. ही महागडी वीज विकत घेण्यास 'महावितरण'ने नकार दिला. त्याविरोधात निकाल देऊन राज्य वीज नियामक आयोगाने 'महावितरण'ला वीजेच्या खरेदीपोटी सुमारे ५५० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले. हा निकाल अपिलातही कायम राहिला. सर्वोच्च न्यायालयानेही अपिलाचा निकाल कायम ठेवून, अंमलबजावणीच्या सूचना दिल्या. मात्र, नंतर वीज नियामक आयोगाने आपल्याच निर्णयासंदर्भात फेरविचार करणार असल्याचे सांगितले. हा फेरविचाराचा निर्णय नियमबाह्य असल्याचा आदेश अपिलीय न्यायाधिकरणाने दिला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट पंतप्रधानांकडे पत्र लिहून अपिलात खासगी कंपन्यांना झुकते माप देण्यात येत असल्याचा आरोप केला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांकडे तक्रार केली.

> राज्याच्या मुख्यमंत्र्यांना अपीलिय न्यायाधिकरणातील सदस्य किंवा अध्यक्षांसंबंधी काही तक्रारी असतील, तर संबंधित सदस्यांना वीज कायद्यातील कलम ११७ प्रमाणे काढून टाकावे, अशी स्पष्ट मागणी पुरावे दाखल करून करता येते. मात्र, राज्य शासनाच्या प्रमुखाने नुसतीच तक्रार करून काहीही साध्य होणार नाही. कारवाई करायची असेल, तर ती कायद्याप्रमाणे करणे गरजेचे आहे.
> - **अभय ओक ,** माजी न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालय

'वीज कायदा २००३, मधील तरतुदींनुसार केंद्र सरकारने अपीलिय न्यायाधिकरण अस्तित्वात आणले. या न्यायाधिकरणाचे निकाल न पटल्यास पक्षकारांना सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. त्यामुळे अपिलातील निकालांबद्दल तक्रारी असल्यास, राज्य सरकारने किंवा शासनाशी संबंधित संस्थांनी सर्वोच्च न्यायालयातच त्या मांडल्या पाहिजेत. याच कायद्यातील कलम ११७ (२) प्रमाणे अपीलिय न्यायाधिकरणाच्या अध्यक्षांना किंवा सभासदांना पदावरून हटवता येते. मात्र, त्याआधी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत त्यांची चौकशी करावी लागते. संबंधित सदस्यांवरील दोषारोप सिद्ध झाल्यास अध्यक्षांना किंवा सभासदांना पदावरून काढता येते, अशी प्रक्रिया कायद्यात आहे,' असे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय ओक यांनी सांगितले.

'या सगळ्या वादात 'एमईआरसी' किंवा महावितरणशी संबंधित प्रकरणे ऐकणार नाही किंवा त्यांच्याशी संबंधित अपिलांची सुनावणी घेणार नाही, अशी भूमिका अपीलिय न्यायधीकरणाने घेणे कायद्याप्रमाणे योग्य नाही. न्यायाधिकरणाला आपल्यासमोर आलेल्या अपिलांवर कायद्याप्रमाणे निकाल करावाच लागतो,' असेही ओक यांनी स्पष्ट केले.

कायद्यातील तरतुदी काय?

आहेत.

दोन्ही अधिकाऱ्यांनी २७ ऑक्टोबरपूर्वी प्रतिज्ञापत्र दाखल करावे किंवा सुनावणीच्या दिवशी प्रतिज्ञापत्रासह प्रत्यक्ष उपस्थित राहून बाजू मांडण्याचे निर्देश खंडपीठाने दिले आहेत.

'महाराष्ट्र वीज नियामक आयोग आणि महावितरणशी संबंधित विधाने न्यायाधिकरणाचा अवमान करणारी आणि या न्यायाधिकरणावर त्यांचा विश्वास नसल्याचे दर्शवणारी होती. त्याची दखल घेऊन न्यायाधिकरणाने 'एमईआरसी' आणि महावितरणशी संबंधित अपिलांवर सुनावणी घेणे तात्पुरते बंद केले. वारंवार आदेश देऊनही या दोन्ही संस्थांनी आपली भूमिका स्पष्ट केली नाही. हे अनाकलनीय असून, त्यावर एमईआरसी आणि महावितरणने स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे,' असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले आहे.

दरम्यान, या संदर्भात मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याशी संपर्क साधला असता, प्रतिसाद देण्यात आला नाही.

गुंतवणुकीच्या आमिषाने ४९ लाखांची फसवणूक

पुणे : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने एका महिलेची सायबर चोरट्यांनी ४९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ५६ वर्षीय महिलेने फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बुधवार पेठेत राहायला आहे. सायबर चोरट्यांनी १८ ऑगस्ट रोजी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत संदेश पाठविला. चोरट्यांनी संदेशात गुंतवणूक योजनेबाबत माहिती दिली होती. गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणावर परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी दाखविले.

महिलेने १५ ते २० दिवसांत चोरट्यांच्या बँक खात्यात ऑनलाइन पद्धतीने ४९ लाख रुपये जमा केले. रक्कम गुंतविल्यानंतर महिलेला परतावा मिळाल्याचे भासविण्यात आले. प्रत्यक्षात महिलेला परतावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास भिंगारदिवे तपास करत आहेत.

महिलेला ८ लाखांना गंडा

घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी, असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी महिलेची आठ लाख ५४ हजार रुपयांची फसवणूक केली. तक्रारदार ४२ वर्षीय महिला वारजे भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांना ऑनलाइन पद्धतीने काम केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले. मात्र परतावा मिळाला नाही.

गांधींचा सत्याग्रह विश्वमानवतेसाठी

उल्हास पवार यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'संपूर्ण जग आज युद्धाच्या छायेत अस्वस्थ आहे. अशा वेळी गांधी जयंती ही संयुक्त राष्ट्रसंघातर्फे जागतिक अहिंसा दिन म्हणून संपूर्ण जगात साजरी केली जाते, हे सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह हा मूलमंत्र गांधीजींनी दिला. गांधीजींचा सत्याग्रह हा विश्वमानवतेसाठी होता,' असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी', 'माईर्स एमआयटी' शिक्षण समूह व पीस विभागाच्या वतीने आयोजित 'स्मरण महामानवांचे' या अभिवादन कार्यक्रमात उल्हास पवार बोलत होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, 'एमआयटी डब्ल्यूपीयू'चे कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, 'एमआयटी'चे वरिष्ठ सल्लागार डॉ. एस. एन. पठाण, प्रा. डॉ. मिलिंद पात्रे, डॉ. महेश थोरवे, लेखक अनिल जोशी, डॉ. विनोदकुमार जाधव, विष्णू भिसे, कर्नल तांदळे आणि बिपीन जोशी या वेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाला प्राधान्य दिले. सर्वधर्मसमभाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार समाजात रुजावा, तसेच भारतातील कोणताही समाज जाती आणि धर्माच्या आधारावर विभागला जाऊ नये, असा त्यांचा विचार होता. मानवता, समता व नैतिकता या तीन मूल्यांवर आधारित सत्याग्रहातून संघर्ष उभा करण्याचे तत्त्व न्या. रानडे यांनी गांधीजींना दिले. लालबहादूर शास्त्री हे गांधीजींचे शिष्य होते. शांतता, नम्रता आणि तत्त्वांप्रती निष्ठा ठेवून शास्त्रींनी देशसेवा केली. त्याच मूल्यांवर डॉ. विश्वनाथ कराड यांचे कार्य सुरू आहे.'

डॉ. कराड म्हणाले, 'सत्य, अहिंसा आणि शांती हेच खरे मानवी जीवनाचे तत्त्व आहे. धर्मग्रंथ हेच खरे जीवनग्रंथ आहेत हे ओळखून गांधीजी सतत शांतीच्या मार्गाने वाटचाल करत राहिले. गांधींचा आणि बुद्धांचा देश म्हणूनच आज जगात भारताची ओळख आहे. जागतिक स्तरावर युद्धजन्य स्थितीत गांधीजींच्या सत्य, अहिंसा, प्रेम, शांती आणि विश्वमानवतेच्या विचारांची गरज आहे.'

शंभराव्या साहित्य संमेलन अध्यक्षांची २४ नोव्हेंबरला निवड

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : जानेवारीमध्ये पुण्यात होणाऱ्या ऐतिहासिक शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड २४ नोव्हेंबर रोजी होणार असल्याचे निश्चित झाले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुण्यात होणाऱ्या बैठकीमध्ये संमेलनाध्यक्षांची निवड तसेच संमेलनाची रूपरेषा निश्चित केली जाणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा वर्धापनदिन शनिवारी (३ ऑक्टोबर) आणि रविवारी (४ ऑक्टोबर) गोव्यातील पणजी येथे साजरा झाला. त्यानिमित्ताने झालेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये सत्ताबदल झाल्यानंतर हे पहिलेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे.

Maharashtra Airport Development Company Ltd.
CIN: U45203MH2002SGC136979

TENDER NOTICE

MADC Invite Request for proposals (RFP) for Appointment of Consultant for Heli Services and Allied Aviation Services – Kumbh Mela 2027

The detailed tender can be seen /downloaded from the website **www.mahatenders.gov.in** from **06/10/2026** from 15.00 Hrs

Sd/-
(DEEPAK KAPOOR)
Vice Chairman & Managing Director, MADC

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
किर्लोस्कर ग्रुप कंपनी
नोंदणीकृत कार्यालय :
लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे - ४११ ००३.
सीआयएन: L29100PN2009PLC133351

kirloskar Oil Engines

फिजिकल समभाग हस्तांतरण आणि डिमटेरियलायझेशनसाठी विशेष विंडोची ५ वी सूचना

आमच्या दि. ६ फेब्रुवारी २०२६ , दि. ५ एप्रिल २०२६ , दि. २ जून २०२६ आणि दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पूर्वीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने आणि सर्व भागधारकांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी त्यांचे दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजीचे परिपत्रक क्र. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/I/3750/2026 नुसार, **एक (१) वर्षासाठी** म्हणजेच **५ फेब्रुवारी २०२६ पासून ते ४ फेब्रुवारी २०२७** या कालावधीत १ एप्रिल २०१९ पूर्वी विकल्या गेलेल्या / खरेदी केलेल्या फिजिकल समभागाच्या हस्तांतरण आणि डिमटेरियलायझेशनची सोय करण्यासाठी एक विशेष सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

ही विशेष सुविधा अशा हस्तांतरण विनंत्यांसाठी देखील उपलब्ध असेल, ज्या पूर्वी सादर केल्या गेल्या होत्या आणि कागदपत्रांमधील / प्रक्रियेतील त्रुटींमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे नाकारल्या गेल्या होत्या / परत पाठवल्या गेल्या होत्या / ज्यांच्यावर कार्यवाही झाली नव्हती. ही सुविधा उपरोक्त परिपत्रकात परिभाषित केलेल्या लागूतेनुसार परवानगी असलेल्या प्रकरणांसाठी उपलब्ध आहे.

कृपया याची नोंद घ्यावी की, या विशेष सुविधेच्या दरम्यान, अशा प्रकारे हस्तांतरित केलेले समभाग केवळ डिमटेरियलाइज्ड (डीमॅट) पध्दतीत जमा केले जातील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी लॉक-इनमध्ये राहतील. अशा समभागाचे हस्तांतरण / तारण ठेवणे/ गहाण ठेवणे या लॉक-इन कालावधीत केले जाणार नाही. शिवाय, इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (IEPF) मध्ये हस्तांतरित केलेल्या समभागावर या सुविधेअंतर्गत प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

पात्र समभागधारकांनी या संदर्भातील त्यांची विनंती त्यासोबत परिपत्रकात नमूद केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांसह कंपनीकडे आणि / किंवा एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नावाने ओळखली जाणारी), रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्स्फर एजंट (आरटीए) यांच्याकडे विहित मुदतीत, दाखल करावी, ज्याचा तपशील पुढे दिला आहे.

एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
(पूर्वीची लिंक इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)
रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्स्फर एजंट (आरटीए)
युनिट : किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
पत्ता : अक्षय्य कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. २०२, २ रा मजला, ऑफ ढोले पाटील रोड, गणेश मंदिराजवळ, पुणे ४११००१
ईमेल : Investor.helpdesk@in.mpms.mufg.com **फोन :** ०२०-२६१६१६२९ / २६१६००८४ **फॅक्स :** ०२०- २६१६३५०३

ही जाहिरात कंपनीच्या https://www.kirloskaroilengines.com/ या संकेतस्थळावर देखील अपलोड करण्यात येईल.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड करिता

सही/-
फराह इराणी
कंपनी सचिव आणि कम्प्लायन्स ऑफिसर

स्थळ : पुणे
दिनांक : ०५.१०.२०२६

• दूरध्वनी: +91 20 25810341 • दूरभाष: +91 20 25813208, 25810209
• ईमेल: investors@kirloskar.com • संकेतस्थळ : www.kirloskaroilengines.com

"Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Ltd. and Kirloskar Oil Engines Ltd. is the Permitted User"

बजाज फायनान्स लिमिटेड
CIN-L65910MH1987PLC042961
नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय: चौथा मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोडजवळ, विमान नगर, पुणे ४११ ०१४

मुदत ठेव योजना
CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

₹३ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (७ ऑक्टोबर २०२६ पासून लागू) वैध आहे. अनिवासी भारतीयांसाठी, OCI साठी व PIO साठी

नियमित ठेवीदार

नियमित एकरकमी: ₹१५,००० ते ₹३,००,००,०००					
तक्ता १					
नियमित कालावधी	संचयी	विगर- संचयी			
	मुदत पुर्तीला	मासिक	त्रैमासिक	सहामाही	वार्षिक
	(% प्र.व.)	(% प्र.व.)	(% प्र.व.)	(% प्र.व.)	(% प्र.व.)
१२ - १७ महिने	६.८०	६.६०	६.६३	६.६९	६.८०
१८ - ३० महिने	७.००	६.७१	६.८२	६.८८	७.००
३१ - ३६ महिने	७.७५	७.४९	७.५३	७.६१	७.७५

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहील.

ख) केवळ एनआरओ (अ-निवासी बँक) खात्यांमधून ठेवीचा निधी स्वीकारलं जाईल. ठेवीची रक्कम ही NRE / FCNR (B) खात्यामधून भरली केलेली नसावी.

ग) सर्व ज्येष्ठनागरीक ग्राहकांना, लागू असलेल्या मंजूर मार्गदर्शनाप्रमाणे ०.१०% प्रति वर्ष इतका मुदतीकरता लाभ दिला जाईल.

घ) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल तर (म्हणजे, वय वर्षे ६० हून जास्त असलेल्या व्यक्ति, कायदा पुरावाच्या लस्तुही अधीन): ₹३ (तीन) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.७०% पर्यंतच्या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल.

ङ) ₹३ कोटीहून जास्त रकमेच्या बल्क ठेवींवरील व्याजदर हा, प्रत्येक ठेवीनुसार, प्रसिद्ध केलेल्या कार्डावरील दरापेक्षा वेगळा असू शकतो आणि त्या त्या केसच्या आधारावर तो ठरवता जाईल पण असा वेगळा दर हा किर्लो बँकेने निश्चित केलेल्या व्याजदराच्या मार्गदर्शनाने असेल.

च) मुदत-पूर्तीच्या (मॅच्युरिटी) दिनांकापूर्वी ठरलेल्या मिश्रित कालावधीत नूतनीकरणाची कोणतीही विनंती कंपनीला प्राप्त झालेली नसल्यास, कंपनीकडून मुदत-पूर्तीच्या दिनांकाला ठेव परत केली जाईल. एनईएफटी किंवा आरटीजीएस आणि / किंवा धनादेशाद्वारे (जर एनईएफटी/आरटीजीएस द्वारे हस्तांतरण नाकारले गेल्यास) ठेव अर्जात नमूद केलेल्या ठेवीदाराच्या बँक खात्यात देय दिले जाईल.

छ) ठेवीच्या (किंवा त्यातील एखाद्या हिस्साच्या) नूतनीकरणासाठीची विनंती ठरलेल्या, मुदत-पूर्तीच्या दिनांकापूर्वी २४ तास आधी करता येऊ शकेल, त्यासाठी सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अधिसूचक सहानगांद्वारे किंवा कंपनीच्या पेन्नेलयरील राष्ट्रीय क्लिअरिंगद्वारे लेखी विनंती देता येऊ शकेल, त्यामागे कंपनीला ठेव-पत्ती किंवा ठेवीचे (किंवा त्यातील एखाद्या हिस्साचे) नूतनीकरण ठरलेल्या देय दिनांकाला करता येईल, उपरोक्त उल्लेखित कालावधीचा आधी ठेवीच्या नूतनीकरणाची विनंती ठेवीदाराने सादर करण्याची आहे. नूतनीकरणाच्या विनंतीसोबत सर्व ठेवीदारांनी विहित अर्जाचा नमुना व्यवस्थीत भरून व सह्या करून द्याव्यात आहे. नूतनीकरण हे, ठेवीच्या नूतनीकरणाच्या दिवशी प्रचलित असलेले व्याजदर आणि इतर अटी व शर्ती यांच्या अधीन राहील. विद्यमान ठेवीच्या मुदत-पूर्तीच्या दिवसानंतर एकदीआर हे रद्दबातल आणि अर्थहीन ठरत असल्याने ठेवीच्या नूतनीकरणाच्या वेळी त्याची आवश्यकता असेलच असे नाही.

ज) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी २४ तास आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अधिसूचक सहानगांद्वारे किंवा कंपनीच्या पेन्नेलयरील राष्ट्रीय क्लिअरिंगकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरुस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड सिस्टेमिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७३ नुसार खालीलप्रमाणे तपशील.

क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.

ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987

ग. प्रॉफिटस्/डिव्हिडेंडस्:

वरील तक्त्यांचा संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तात्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, खराबी लस्तुद वरच्या आकी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

आर्थिक वर्ष रोजी संपले	नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व	कर-पश्चात	लाभांश %
३१.०३.२०२४	१८,०१३.०८	१३,६४४.११	१८००
३१.०३.२०२५	२१,६७८.०१	१६,६१९.५०	२२००
३१.०३.२०२६	२३,७१९.९०	१८,०८३.८४	६००

घ. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या आणि रहाणे व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पहातात. कंपनीचा व्यापार-उद्योग आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनाशी व्यवस्थापकीय संचालकांना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:

नाव	पत्ता	व्यवसाय
श्री. संजीव बजाज (अध्यक्ष)	प्लॉट क्र.५२,लेन क्र.३ कोरेगांव पार्क, पुणे सिटी – ४११००१.	उद्योगपती
श्री. राजीव जैन, (उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक)	डी-२, आयडी प्लेन, मॅरिगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे – ४११०१४.	नोकरी
डॉ गौतम पटेल (स्वतंत्र संचालक)	४४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे – ४११ ००१.	व्यवसाय
श्री अनामी रॉय (स्वतंत्र संचालक)	६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, वरळी, मुंबई ४०० ०३०.	सेवानिवृत्त सनदी सेवक
श्री प्रमोद कपरे (स्वतंत्र संचालक)	२१ सी, पृथ्वीराज, पेस्तम रोड, कंबाला हिल, मुंबई – ४०० ०२६.	व्यवसाय
श्रीमती राधिका हरिभक्ती (स्वतंत्र संचालक)	५१, नेवार टॉवर बी, कफ परेड, मुंबई – ४०० ००५.	आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक
डॉ. अरिंदम मजुमदार (स्वतंत्र संचालक)	एस१/४, २रा मजला, हौज खास, नवी दिल्ली – ११० ०१६.	व्यावसायिक
श्री. तरुण बजाज (स्वतंत्र संचालक)	बंगला क्र.३८, नवीन मोती बाग, नवी दिल्ली – ११० ०२१.	स्वतंत्र सल्लागार
श्री. अजय कुमार चौधरी (स्वतंत्र संचालक)	प्लॉट क.१३०४, १३वा मजला, केर्साट वे टॉवर क.६, जेरबाई वाडीया रोड, पगम, मुंबई – ४०० ०९२.	व्यावसायिक

च. संक्षिप्त अलिकडच्या तीन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमधे दिखाल्याप्रमाणे कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश (₹ कोटींमध्ये)

तपशील	३१ मार्च २०२६ रोजी	३१ मार्च २०२५ रोजी
मालमत्ता		
आर्थिक मालमत्ता		
रोख व रोख समतुल्य	१,६३३.८८	३,३४४.४१
रोख आणि रोख समकक्षताशिवाय बँक बॅलन्स	११,४४१.४४	९,०८०.९८
व्युत्पन्न आर्थिक साधने/डेरीवेटीव्ह फायनान्शियल इन्स्ट्रुमेंट्स)	२,३८५.९६	२७१.१७
व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स)	१,५७५.७६	१,४९६.३१
कर्जे	३,५८,२२५.१६	३,०४,३५९.१६
गुंतवणूकी	३८,७४९.३७	४१,९१६.२३
इतर आर्थिक मालमत्ता	४,७८२.७३	२,४२६.९२
एकूण आर्थिक मालमत्ता	**४,२६,५३९.८७**	**३,६२,५७६.०६**
बिगर-आर्थिक मालमत्ता		
लाखाची कर मालमत्ता (निव्वळ)	३०२.०८	४०४.५७
स्थगित कर मालमत्ता (निव्वळ)	१,४३०.४४	१,०४४.९४
प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट	२,६८०.६१	२,५३९.५१
भांडवल काम प्रगतीपथावर	६१.८३	२६.७४
विकासा अंतर्गत अमूर्त मालमत्ता	५७.४३	५२.४६
अमूर्त मालमत्ता	१,०४३.६९	१,०४३.९४
इतर बिगर-आर्थिक मालमत्ता	१८८.४३	२३०.९४
एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता	**५,६६३.५९**	**५,२९३.५०**
एकूण मालमत्ता	**४,३२,२०३.४९**	**३,६७,८६९.५६**
देणी व इक्विटी		
देणी		
आर्थिक देणी		
व्युत्पन्न आर्थिक साधने देय	–	२५.१३
व्यापार देय		
-छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी	७.९१	९.२७
-छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर सगळीची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी	१,२८०.५०	१,११९.८४
इतर देय		
-छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी	०.३३	०.४२
-छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर सगळीची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी	९१४.६५	८७६.९९
कर्जावरचा निव्वळदेय	१,३३,५२७.०८	१,११,०१०.८८
उधारी (बर्न तीचे प्रमाणत)	१,१८,०००.४५	८९,७३७.६६
ठेवी	६८,४८५.५५	७१,३६५.५२
उप-कर्जे	३,८०५.३१	३,१०३.१४
इतर आर्थिक देणी	२,४१६.५०	१,६९०.६४
एकूण आर्थिक देणी	**३,२७,५९१.५८**	**२,४८,८६१.४९**
बिगर-आर्थिक देणी		
सध्याचे कराचे देणे (निव्वळ)	१७५.५४	५४.६७
तरतुदी	६७३.२६	४६४.३७
इतर बिगर-आर्थिक देणी	६४०.५९	४९३.९२

मराठी मुला-मुलींना नोकऱ्या मिळाल्याच पाहिजेत

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची परखड भूमिका

लोकसत्ता प्रतिनिधी





'दादागिरीची भाषा चालणार नाही'

'न्याय आणि सत्यासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यांना त्रास देऊन त्यांच्या स्वप्नांचा चुराडा करण्याचा अधिकार कोणाला दिला,' असा सवाल शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सोमवारी उपस्थित केला. 'प्रशासनात सुधारणा व्हावी ही विद्यार्थ्यांची माफक अपेक्षा आहे, ती पूर्ण करण्यासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घ्यायला हवी. मंत्रालयात सत्तेत बसलेले लोक संघर्ष करूनच आजच्या स्थानी पोहोचले आहेत. या पूर्वीच्या आंदोलनांमध्ये त्यांनी केलेली भाषणे आठवून पाहावीत. सत्ता मिळेपर्यंत सामान्यांची भाषा करायची आणि सत्ता आली की बघून घेण्याची भाषा करायची, हे योग्य नाही,' अशी टीका शेट्टी यांनी केली. 'महाराष्ट्र हा महापुरुषांचा आहे. येथे दादागिरीची भाषा चालणार नाही. सत्ताधाऱ्यांच्या लोकांनी विद्यार्थ्यांना त्रास दिला, तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल,' असा इशाराही त्यांनी दिला.

पुणे : 'तरुणांनी भलत्या गैरसमजात, स्वप्नात न राहता वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. कोणतेही सरकार असले, तरी ७० हजार पदांची पदभरती होणार नाही, अशा कानपिचक्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्पर्धा परीक्षार्थ्यांना दिल्या. 'राज्यातील मराठी मुला-मुलींना नोकऱ्या मिळाल्याच पाहिजेत. महाराष्ट्रातील मुलांना नोकऱ्या लागण्यासाठी कोणाचेही पाय धरावे लागले, तर त्यासाठी राज ठाकरे तयार आहे,' अशी भूमिकाही ठाकरे यांनी मांडली.

'एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी नवी पेठेतील एस. एम. जोशी पूल येथे आमदार रोहित पवार यांचे गेल्या चार दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. ठाकरे यांनी परीक्षार्थ्यांशी संवाद साधला. आंदोलनस्थळी भेट देऊन स्पर्धा परीक्षार्थ्यांशी संवाद साधला. सद्य:स्थितीचे भान देतानाच ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय स्थितीवरही टीका केली. ठाकरे म्हणाले, 'महाराष्ट्र जातीपातीच्या राजकारणात गुंतला आहे. तरुण अभ्यास करत आहे. पण, नशिबी पेपरफुटी येत आहे. तुम्हाला आलेला राग तात्पुरता असू नये; तो कायम राहिला पाहिजे. मात्र, वस्तुस्थिती आणि परिस्थिती ओळखून आंदोलनाची दिशा ठरवा. भलत्या गैरसमजात राहू नये. आरक्षण हवे म्हटले जाते. पण, सरकारी नोकऱ्या राहिलेल्या नाहीत. जे काही सरकारी आहे, ते खासगी केले जात आहे. खासगी क्षेत्रात आरक्षण नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील उमेदीचा काळ सरकारी धोरणांमुळे वाया जात आहे. तरुणांना केवळ गृहित धरले जात आहे.'

'पैसे फेकून, जेवणावळी घालून, दारू वाटून निवडणूक जिंकता येते हा समज दूर केला जात नाही तोपर्यंत कधीही न्याय मिळणार नाही. पक्ष बदलणाऱ्यांना पुन्हा निवडून दिले जात आहे. अशा लोकांना मतदारांनी शिक्षा दिली, की ते सुतासारखे सरळ होतील, मतदारांचे म्हणणे ऐकून घेतील. लोकप्रतिनिधींच्या मनात जनतेची भीती निर्माण होत नाही, तोपर्यंत काहीही होणार नाही. भलत्या गैरसमजात, स्वप्नात राहू नका, वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. सरकारला लगेच कळेल, पावले टाकावी लागतील, असा दबाव निर्माण झाला पाहिजे,' असेही ठाकरे यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांची आंदोलने बेकायदा

पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्याचा इशारा; शिकवणी, अभ्यासिका चालकांसह विद्यार्थ्यांना नोटिसा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीवरून शहरात तीन वेगवेगळ्या भागांत आंदोलने सुरू आहेत. ही आंदोलने बेकायदा असून, आंदोलकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे', असा इशारा पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सोमवारी दिली.

'संबंधित आंदोलनांना पोलिसांनी परवानगी नाकारली होती. परवानगी नाकारल्यानंतर पोलिसांनी २९ शिकवणी चालक, अभ्यासिका चालक आणि ५१ विद्यार्थ्यांना नोटीस बजावली आहे,' असे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.

'स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून एस. एम. जोशी पूल, लोकमान्य टिळक चौक, शास्त्री रस्त्यावर आंदोलन करण्यात येत आहे.

पोलिसांनी संबंधित आंदोलनांना परवानगी नाकारण्यात आली. परवानगी नाकारल्यानंतरही आंदोलन करण्यात येत आहे. आयोजकांना आंदोलन न करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. आंदोलनास विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्त्यांनी भेट दिली आहे.

आंदोलनामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आंदोलनाच्या परिस्थितीवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात आले आहे. संबंधित आंदोलनांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मदत करणारे खासगी शिकवणी चालक, अभ्यासिका चालकांसह विद्यार्थ्यांनी नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत सांगण्यात आले होते. आंदोलन ठिकाणचे चित्रीकरण, अन्य माहिती पोलिसांकडून संकलित करण्यात आली आहे. या माहिती पडताळणी केल्यानंतर संबंधितांविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे', असे त्यांनी स्पष्ट केले.

> आंदोलन करण्याचा आधिकार असला, तरी संबंधितांनी पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी नाकारल्यानंतर आंदोलन केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.
> - अमितेशकुमार, पोलीस आयुक्त

ड्रोनद्वारे चित्रीकरण; कारवाईचा इशारा

नवी पेठेतील एस. एम. जोशी पुलाजवळ सुरू असलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे चित्रीकरण करण्यात आल्याचे दिसून आले. पोलीस परवानगीशिवाय ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करणे हा गुन्हा आहे. या प्रकरणात संबंधितांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे. या ड्रोनचा वापर कोणी केला, याचीही चौकशी केली जाणार आहे.

रियाजातूनच कलाकाराची खरी ओळख

पं. भीमसेन जोशी पुरस्काराने संतूरवादक पं. बिपुल कुमार राय सन्मानित

लोकसत्ता प्रतिनिधी



पुणे : 'संगीत ही भारतीय जीवनपद्धतीशी आणि संस्कृतीशी घट्ट जोडलेली परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तरुण कलाकारांनी सातत्याने रियाज आणि गुरूंबद्दल समर्पणाची भावना ठेवणे आवश्यक आहे. रियाजातूनच कलाकाराची खरी ओळख निर्माण होते,' असे मत संतूरवादक पं. बिपुल कुमार राय यांनी व्यक्त केले.

गुरुकुल कलाश्री संगीत मंडळ आणि द औंध सोशल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित 'भारतरत्न पं. भीमसेन जोशी संगीत महोत्सवा'त आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते पं. राय यांना पं. भीमसेन जोशी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. द औंध सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अमित गायकवाड, अध्यक्षा स्वाती गायकवाड, गुरुकुल कलाश्री संगीत मंडळाचे अध्यक्ष पं. सुधाकर चव्हाण या वेळी उपस्थित होते.

पं. भीमसेन जोशी यांच्या नावाने पुरस्कार मिळणे ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि भावनिक बाब असल्याचे सांगून राय यांनी 'तरुण कलाकारांना अशा प्रकारे प्रोत्साहन मिळणे ही आनंदाची गोष्ट आहे. संगीताची सेवा आणि साधना करत असताना मिळणारा हा सन्मान माझ्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे,' असे स्पष्ट केले.

'रियाज करा, राज्य करा,' हा संदेश देत त्यांनी कलाकार कोणत्या घराण्यातून किंवा कुटुंबातून आला आहे, यापेक्षा त्याची मेहनत आणि सातत्य महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. स्वतः शेतकरी कुटुंबातून आले असूनही विविध देशांमध्ये भारताचे सांस्कृतिक राजदूत म्हणून सादरीकरण करण्याची संधी मिळाल्याचा अनुभव राय यांनी सांगितला. सध्याच्या 'रील्स'च्या युगात अल्पावधीत कलाकारांचे मूल्यमापन होत असले, तरी अशा काळात संगीत महोत्सव रसिकांना आणि कलाकारांना जोडण्याचे महत्त्वाचे काम करीत असल्याचेही पं. राय म्हणाले.

गणेशोत्सवातील पडद्यामागील कार्यकर्त्यांचा सन्मान



लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सार्वजनिक उत्सव साजरे होताना काही कार्यकर्ते समोर दिसतात, तर काही जण पडद्यामागे राहून उत्सव यशस्वी करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. उत्सवानंतर रातोरात कचरा साफ करून दुसऱ्या दिवशी रस्ते स्वच्छ ठेवणारे सफाई कर्मचारी, वीज व्यवस्था सुरळीत ठेवणारे विद्युत कर्मचारी, तसेच २०-२० तास काम करून वाहतुकीचे नियोजन चोख ठेवणारे पोलीस कर्मचारी यांचे योगदान महत्त्वाचे असते. अशा पडद्यामागे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करून मानाच्या चौथ्या तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने त्यांच्या योगदानाची दखल घेतली.

या कृतज्ञता सन्मान सोहळ्यास आमदार हेमंत रासने, नगरसेविका स्वप्नाली पंडित, स्वरदा बापट, नगरसेवक कुणाल टिळक, उदय लेले, साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारुती मंडळाचे अध्यक्ष रवींद्र माळवदकर, गुरुजी तालीम मंडळाचे अध्यक्ष प्रवीण परदेशी, तुळशीबाग मंडळाचे उपाध्यक्ष विनायक कदम, कोषाध्यक्ष नितीन पंडित, किरण चौहान, सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, मोहन साखरिया उपस्थित होते. अग्निशामक दलाचे अधिकारी, जीवरक्षक, स्वच्छता कर्मचारी यांच्यासह वाद्यपथकातील वादक, सजावट कलाकार, मांडववाले, मेट्रो सेवा, पौरोहित्य करणारे गुरुजी यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

रासने म्हणाले, 'ज्या लोकांच्या योगदानातून हा उत्सव साजरा होतो, त्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्यांचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे.'

पंडित म्हणाले, 'उत्सवादरम्यान पडद्यामागे राहून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.' विनायक घाटे यांनी सूत्रसंचालन केले.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे नवरात्रौत्सवासाठी स्पर्धा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : नवरात्रौत्सवात शहरातील अनेक नवरात्र उत्सव मंडळे धार्मिकतेसोबतच सांस्कृतिक आणि सामाजिकता जपतात. तसेच उत्सवामध्ये विविध प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. शहरातील नवरात्र उत्सव मंडळांसाठी 'श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग-नवरात्रौत्सव स्पर्धा' यंदा प्रथमच आयोजित करण्यात आली आहे.



'स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य असून, पुणे शहरस्तरावरील नवरात्र उत्सव मंडळे यामध्ये सहभागी होऊ शकतात. उत्सव काळासह वर्षभरात मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे परीक्षण केले जाणार आहे. ट्रस्टचे विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, शिल्पकार विवेक खटावकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा परीक्षण समितीमध्ये सहभाग असणार आहे,' अशी माहिती मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, तसेच प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

स्पर्धेत प्रथम येणाऱ्या मंडळास २१ हजार, द्वितीय क्रमांकाच्या मंडळास १५ हजार आणि तृतीय क्रमांकाच्या मंडळास ११ हजार रुपयांचे पारितोषिक आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणाऱ्या तीन मंडळांना प्रत्येकी पाच हजार रुपये अशी एकूण ७५ हजार रुपयांपेक्षा अधिक पारितोषिके देण्यात येणार आहेत. मंडळांनी स्पर्धेतील सहभागाकरिता ७७००७६७६७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

सीमावर्ती भागात शौर्याची प्रेरणा

शिवराय-महाराणा प्रताप यांचे पुतळे पुण्यातून रवाना

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप हे शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे पुतळे सीमावर्ती भागात प्रस्थापित केल्याने आपल्या समृद्ध इतिहासाचा आणि शौर्यपरंपरेचा संदेश तेथील जवान, नागरिकांपर्यंत पोहोचेल. पूँछसारख्या संवेदनशील भागात आणि भारत-चीन सीमेकडे जाणाऱ्या या स्मारकांमुळे जवानांना आणि स्थानिक नागरिकांना प्रेरणा मिळेल,' असे मत ब्रिगेडियर (निवृत्त) हेमंत महाजन यांनी व्यक्त केले.

शिवसृष्टी, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, आम्ही मावळे आणि कॉसमॉस ग्रुप यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात्रेच्या प्रारंभी शिवसृष्टी येथे दोन्ही पुतळ्यांचे मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वहाणे, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह सुधीर थोरात, शिल्पकार महिंद्र थोपटे, कॉसमॉस ग्रुपचे जनक शाह, शिवसृष्टीचे व्यवस्थापक अनिल पवार या वेळी उपस्थित होते. शिवसृष्टीतून छत्रपती शिवाजी महाराज आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यांची 'शिव-राणा शौर्य यात्रा' रवाना झाली. 'आम्ही पुणेकर' संस्थेच्या वतीने आयोजित या यात्रेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा जम्मू-काश्मीरमधील पुंछ येथे, तर वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा पुतळा हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथे प्रस्थापित करण्यात येणार आहे. 'विकास माने यांनी सूत्रसंचालन केले.

रुग्णालयात शिवीगाळ करून मारहाण

महिलेसह सात जणांविरुद्ध गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : रुग्णालयातील कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याने जाब विचारणाऱ्या एकाला मारहाण करण्यात आल्याची घटना हडपसर भागात घडली. या प्रकरणी हडपसर पोलिसांनी महिलेसह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या बाबत रमीत राकेश गुप्ता (वय ३५, सध्या रा. हडपसर, मूळ रा. हरियाणा) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका महिलेसह नातेवाइकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

